जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७९३ दिनांक - ०७/११/२०२३**

विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर

**लोहगाव येथील कलवडवस्ती मध्ये गाड्यांची तोडफोड करुन दहशत माजवणा-यांवर केली कारवाई**

दि.०६/११/२०२३ रोजी मध्यरात्री लोहगाव येथील कलवडवस्ती मध्ये तीन इसमांनी बडी मस्जिद गल्ली पासुन ते दत्त मंदीर चौक, व दत्त मंदीर चौक ते खेसे पार्क रोड वर पार्क असलेल्या दुचाकी, तीनचाकी व चारचाकी अशा एकुण २५ गाड्यांची कोयत्याने तोडफोड करुन दहशत माजविल्याबाबत विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. आनंदराव खोबरे यांनी तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक विजय चंदन, यांना दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणे सुचना दिल्या होत्या.सदर बाबत श्री.विजय चंदन हे तपास पथकातील कर्मचारी आरोपींचा शोध घेत असताना, पोलीस अंमलदार उमेश धेंडे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती की, रात्री कलवड वस्ती मध्ये तोडफोड करणारे आरोपी हे कलवडवस्ती येथील मोकळ्या मैदाना मधील झाडीमध्ये लपुन बसलेले आहेत. त्याप्रमाणे तीन इसमांना शिताफिने ताब्यात घेण्यात आले असुन, त्यामध्ये **हाशिम खलील शेख वय १८ वर्ष रा. लेननंबर २, विकासनगर कॉलनी, कलवडवस्ती लोहगाव पुणे** व त्याचे दोन विधिसंघर्षित साथीदारांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर इसमांकडुन एक लोखंडी हत्यार, एक सत्तुर व एक मोटार सायकल जप्त करण्यात आली असुन, दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री. रविंद्रकुमार वारंगुळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त श्री. शशिकांत बोराटे, मा.सहा पोलीस आयुक्त श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली विमानतळ पोलीस स्टेशनचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. आनंदराव खोबरे पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्रीमती संगीता माळी, सपोनि विजय चंदन, पोलीस अंमलदार उमेश धेंडे, राकेश चांदेकर, अंकुश जोगदंडे, दादासाहेब बर्डे, योगेश थोपटे, सचिन जाधव, शैलेश नाईक, ज्ञानेश्वर आवारी यांनी केली आहे.

